③ 2021-22 SMP



# PEER REVIEW COMMITTEE

Our Peer review committee scrutinizes and regulates the quality of content to be published, if required the committee invites experts in the field to review and comment on manuscripts received. The manuscripts submitted to our journal first go through an initial screening by the editorial board. Those manuscripts clear the screening is sent to at least two experts for peer review. Peer reviewers independently make a recommendation to the journal editor as to whether the manuscript should be rejected or accepted (with or without revisions). The journal editor considers all the feedback from peer reviewers and makes an informed decision to accept or reject the manuscript.



| | |
|---|---|
| 1) **Dr B W Somatkar, HoD English Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** | 2) **Dr Bharat Avhale, Dept of History, R Z College, Malegaon, Dist Washim.** |
| 3) **Dr D K Rathod, HoD Economics Dept. Gajanan Maharaj College, Borgaon Manju Tq Dist Akola.** | 4) **Dr D N Badar, Panjabrao Jadhao College, Mehkar.** |
| 5) **Dr Dilip Arjune, HoD Economics Dept., JES College, Jalna.** | 6) **Dr G B Ghayal, Librarian Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** |
| 7) **Dr M R Shinde, HoD Sociology Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** | 8) **Dr P H Barad, Librarian, SPM College, Chikhali, Dist Buldana.** |
| 9) **Dr P R Junghare, HoD History Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** | 10) **Dr R G Suralkar, HoD Political Science Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** |
| 11) **Dr Rajesh Maske, Dept of English, RA College, Washim.** | 12) **Dr S T Kute, HoD Economics Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** |
| 13) **Dr S V Jadhao, Panjabrao Jadhao College, Mehkar.** | 14) **Dr Santosh Dhamne, HoD Dept of Economics, TJ College, Washim.** |
| 15) **Dr Smt L R Jawale, HoD Marathi Dept., R Z College, Malegaon, Dist Washim.** | 16) **Dr Smt M P Khedekar, HoD Marathi Dept., Uttamchand Bagadia College, Risod, Dist Washim.** |
| 17) **Dr Smt S M Pawar, HoD Marathi Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** | 18) **Dr Smt V R More, HoD Home Economics Dept. Smt Sindhutai Jadhao Arts and Science Mahavidyalaya, Mehkar.** |
| 19) **Dr Umesh Patil, Dept of English, RDG Mahila College Akola.** | 20) **Dr V P Jadhao, Librarian, TJ Mahavidyalaya, Washim.** |
| 21) **Dr Vijay Gaikwad, Librarian, Pushpadevi Patil College, Risod, Dist Washim.** | |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | क्रीडा शिक्षण | प्रा. डॉ. संगीता मंगेश खडसे<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान<br>महाविद्यालय मेहकर, जि.बुलढाणा. | 28 |
| 9 | गृह अर्थशास्त्र च्या माध्यमातून स्वयंरोजगार व स्त्री सक्षमीकरण | प्रा. डॉ. वैशाली रा. मोरे<br>गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय<br>मेहकर, जिल्हा बुलडाणा. | 31 |
| 10 | संतांची ईश्वरविषयक संकल्पना | प्रा. डॉ. सविता माधवराव पवार<br>श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान<br>महाविद्यालय, मेहकर. | 35 |
| 11 | ICT Skills and Competencies of Librarians in Colleges of Sant Gadge Baba Amravati University, Amravati | Dr Gajanan Baliram Ghayal<br>Director knowledge resource centre shrimati Sindhutai Jadhav Arts and Science Mahavidyalay Mehkar district Buldhana. | 38 |
| 12 | गणित विषय अध्ययनातून विद्यार्थ्यांत संक्रमित होणारी मूल्य | श्री चव्हाण नवीन लिंबराज<br>सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव,<br>ता. माजलगाव, जि.बीड. | 45 |
| 13 | कोरोना के परिप्रेक्ष्य में : बदल गये दस्तूर | प्रा. धन्यकुमार जिनपाल बिराजदार, सोलापुर, महाराष्ट्र 9423330737 | 47 |
| 14 | लोकसंख्या वाढ भारतीय अर्थ व्यवस्थे समोरील आव्हान | डॉ. धनाजी दगडूराव खेबडे<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय,<br>अंबाजोगाई, जि.बीड. | 52 |
| 15 | **Tanqeer Aur Naqqad** | Siraj Anwar Mohammed Miran<br>Secondary Teacher<br>Z.P. High School, Tamsa Nanded. | 55 |

**10**

# संतांची ईश्वरविषयक संकल्पना

प्रा. डॉ. सविता माधवराव पवार
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान
महाविद्यालय, मेहकर.

संत तुकारामकालीन समाज हा कर्मकांडामध्ये गुरफटलेला होता. जाखाई, जोखाई, मायराणी, मेसाबाई ह्या क्षुद्र देवदेवता आहेत. रंडी चंडी या शक्ती देवता तर मद्यमांस भक्षण करतात; तर खंडोबा, भैरोबा हे रोटीसाठी आसुसलेले असतात, लंबोदर गणपतीला मोदक फार आवडतात तर म्हसोबा, महिषासुर तर वेताळातच जमा होण्यासारखे आहेत. एका पांडुरंगावरच आपले चित्त हे केंद्रित केले पाहिजे , पंढरपूरच्या विठ्ठलाची भक्ती करायला हवी. इतर देवदेवतांची भक्ती करण्याची आवश्यकता नाही असे तुकाराम महाराज आपल्या अभंगाद्वारे समाजाचे प्रबोधन करतात.

"देही असोनिया देव,वृथा फिरतो निर्दैव।
देव आहे अंतर्यामी, व्यक्त हिंडे तीर्थग्रामी।
नाभी मृगाचे कस्तुरी, व्यर्थ हिंडे वनांतरी।
साखरेचे मूळ ऊसे, तैसा देही देव दिसे।
दुधी असता नवनीत, नेणे तयाचे मथित।
तुका सांगे मूढजना, देही देव कां पाहाना"४

अशा क्षुद्र देवतांच्या उपासनेमुळे समाज हा

त्याबरोबर देवतांचीही फजिती करतात. कवड्यांच्या माळा गळ्यामध्ये घालायच्या आणि हाती परडी घेऊन दारोदार भीक मागायची हे तुकोबांना अवडंबर वाटते. आपल्या साधनेतून आत्मज्ञान प्राप्त झालेल्या तुकोबारायांना 'देव झाले अवघे जन' अशी भावना प्राप्त होते आणि मग मीठ जसे पाण्यामध्ये विरघळून जाते, अशा प्रकारची त्यांची अवस्था होते. वेगळे असे काही उरतच नाही ते पूर्णपणे ईश्वरमय होऊन जातात, विठ्ठलमय होऊन जातात. पांडुरंग आणि आपण एकच आहोत याची जाणीव त्यांना होते. जीवनातील सर्व अंधःकार दूर होतो आणि जीवनामध्ये ज्ञानाचा प्रकाश पडायला लागतो. अद्वैत भावाची अनुभूती त्यांना होते. मी आणि विठ्ठल वेगळे आहोत कुठे, सर्वत्र अद्वैत भाव व्यापून उरलेला त्यांना अनुभवाला येतो. जिथे जिथे मी जातो तेथे तेथे विठ्ठल आपल्या सोबतच आहे. संसार आणि परमार्थाच्या वाटेवर त्याचाच आपल्याला आधार आहे आणि त्याच्याचमुळे आपल्या बरळण्याला सुद्धा कवित्वाचा स्पर्श होतो. अंतर्बाह्य एकत्वाची भावना प्राप्त करून देण्याची शक्ती ही त्या पांडुरंगामध्येच आहे याची जाणीव होऊन त्यांच्यातील भक्त आणि पांडुरंग यांच्यातील द्वैत संपले आणि एकत्वाची भावना सर्व विश्व व्यापून उरलेली दिसते, अशाप्रकारचा हा अनुभव म्हणजे 'शब्देविना संवाद' आपली अनुभूती व्यक्त करायला शब्द सुद्धा त्यांना थिटे वाटायला लागतात. ईश्वर इतरत्र कुठेही नाही तर आपल्या

आपल्याला प्रत्यय येतो. त्यासाठी 'देह जावो अथवा राहो पांडुरंगी दृढ भाव' धरण्याची भावना ते व्यक्त करतात. आत्मस्वरूप देवाची एकदा प्रतीती आल्यानंतर त्यांना आपण विश्वात्मक झालेलो आहोत आणि आपला देह हा उपकारापुरता उरला आहे, अशा भावनेचे तरंगत त्यांच्या मनावर उमटतात. पांडुरंगाशी, चैतन्याशी एकरूप झाल्यानंतर जगण्यातला आत्मविश्वास त्यांना प्राप्त होतो.

**संत गाडगेबाबांचा ईश्वरविषयक दृष्टिकोन:**

संत गाडगे बाबा यांचे जे 'अखेरचे कीर्तन' उपलब्ध आहे त्याद्वारे आपल्याला त्यांच्या ईश्वरविषयक दृष्टिकोनाची कल्पना येते. संत गाडगेबाबांवर संत तुकाराम महाराज, संत कबीर आदी संतांच्या विचारांचा प्रभाव दिसतो. संत गाडगेबाबा यांच्या एकूणच जीवनाचा विचार केला तर त्यांचे कर्मयोगीपण आपल्याला जाणवते. देव पाहण्यासाठी गेलो आणि मी स्वतःच देव होऊन गेलो. देव तर काही दिसला नाही परंतु आपल्यामध्येच देव आहे याची अनुभूती मात्र त्यांना आली. परमेश्वर हा कोणत्याही तीर्थामध्ये नाही. तीर्थाच्या ठिकाणी पाणी आणि पाषाणाचे दर्शन आपल्याला होते. ईश्वर हा भेटत नाही, तो आपल्याशी संवाद साधत नाही आणि ज्याला स्वतःचे रक्षण करता येत नाही त्याला ईश्वर असे म्हणता येत नाही.

यात्रेमध्ये तीर्थाच्या ठिकाणी दगड बसवलेला असतो आणि त्या दगडाला शेंदूर फासून त्याची पूजा केली जाते. दगडाचा देव तो बोलेल कसा, म्हणून तीर्थाला जाण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे आपल्या पैशाची नासाडी होते, वेळ वाया जातो आणि आपल्याला त्रास होतो तो वेगळाच. त्यासाठी देवाचे भजन करायला हवे.कष्ट करता करता आपण देवाचे भजन करावे. ईश्वरप्राप्तीसाठी आपल्या ठिकाणी अभिमान असायला नको. तुकाराम महाराजांचा दाखला देऊन संत गाडगेबाबा म्हणतात, 'ज्याचा अभिमान गेला आणि तुका म्हणे देव झाला.' गणपती बसवणे हे सुद्धा देवाची भक्ती नाही असे संत गाडगेबाबा म्हणतात आणि गणपतीची पूजा करताना दहा दिवस त्याची यथासांग पूजा करून नंतर मात्र आम्ही त्याला पाण्यामध्ये बुडवतो तर याला देवाची भक्ती म्हणता येणार नाही. त्याचबरोबर जे लोक सत्यनारायण करतात त्यांच्यावर गाडगे बाबा कोरडे ओढतात. सत्यनारायण देवाची भक्ती नाही, सत्यनारायणाच्या पोथीमध्ये सांगितले आहे की, साधुवाण्याने प्रसाद घेतला नाही तर त्याची करोडो रुपयांची नौका पाण्यामध्ये बुडाली आणि त्याने प्रसाद भक्षण केला तर नौका बुडाली होती ती पाण्यामधून वर आली. असे प्रत्यक्षात घडणे शक्य नाही हे ते पटवून सांगतात. गाडगे बाबा म्हणतात की, समुद्राच्या किनाऱ्यावर एखादा सत्यनारायण आपण करायला हवा म्हणजे ज्या आगबोटी युद्धाच्या वेळी पाण्यामध्ये बुडालेल्या होत्या त्या कोणत्याही इतर प्रयत्नांशिवाय वर येऊ शकतात आणि अशा पद्धतीने ते लोकांना जागरूक करतात.

मंदिरामध्ये मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यासाठी आपण ती मूर्ती विकत आणतो. देव ही विकत

घेण्याची वस्तू नाही. अशा उदाहरणांद्वारे ते लोकांना खरी ईश्वरभक्ती काय याची जाणीव करून देतात. देव हा या जगामध्ये आहे, जगाची सेवा करणे म्हणजेच ईश्वरभक्ती आणि त्यासाठी ते महात्मा गांधीजींचे उदाहरण देतात. महात्मा गांधी यांनी सत्याग्रह केला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रयत्न केले आणि त्यांनी इंग्रजांना आपल्या देशातून घालवून दिले, आणि म्हणून मानायचे असेल तर महात्मा गांधीजींच्या सारख्यांना आपण देव मानायला पाहिजे. याचा अर्थ संत गाडगे बाबा हे कर्मयोगी होते, कर्माला प्राधान्य देणारे होते. केवळ देवाची भक्ती करून आपल्याला घर प्राप्त होणार नाही. देव घर देत नाही, तर घर बांधण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतात. अंधश्रद्धेच्या गर्तेमध्ये खोलवर बुडालेल्या समाजाला ईश्वरभक्तीचा योग्य मार्ग ते दाखवतात. दया हा खूप मोठा धर्म आहे आणि म्हणून पशुहत्येविरुद्ध ते बोलतात. ईश्वराच्या नावाने कोंबड्या, बकरे कापण्याला त्यांनी विरोध केला. ईश्वर हा बाहेर कुठेही नाही तर तो आपल्यामध्येच वसलेला आहे आणि प्रत्येक प्राणिमात्रांमध्ये तो आहे याची जाणीव इतर संतांप्रमाणे संत गाडगेबाबा यांनी समाजाला करून दिलेली आहे.

संत तुकडोजी महाराज आणि ईश्वरभक्ती:

संत तुकडोजी महाराज ईश्वराला 'विश्वचालक' असे संबोधतात. ईश्वर हा एकच आहे आणि तो सर्व विश्वामध्ये व्यापून उरलेला आहे आणि एकच असून तो अनेक रूपांमध्ये भासतो आहे, अशा या ईश्वराचा अनुभव आला की त्याचे जन्ममरणाचे दुःख हे संपून जाते. आत्मस्वरूपाचे ज्ञान त्याला प्राप्त होते. कोणत्याही प्रकारचा भ्रम त्याच्या मनामध्ये शिल्लक उरत नाही. असा भक्त जो जे कर्म करेल ते त्या ईश्वराची पूजाच होय, अशाप्रकारचा ईश्वरभक्तीविषयक विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा आहे. ईश्वराची प्राप्ती झाल्यानंतर अज्ञान दशा दूर होते. ज्ञानाची कवाडे ही खुली होतात आणि दिव्यत्वाची प्राप्ती होते, जीवन चैतन्यमय होते.

"सूर्य जैसा नभी उगवला। अंधःकाराचा नाश झाला

तैसा तू हृदयी प्रगटला । जीव झाला विश्वव्यापी।।"५

अशा या ईश्वराची प्राप्ती झाल्यानंतर सर्व प्रकारचे विकार शत्रू मरून जातात. वासरू दिसत नसेल तर गाय ही हंबरायला लागते. पक्षिणी आपल्या अंड्याभोवती फिरत असते, आई काम करता करता सुद्धा आपल्या तान्हुल्याला सावरत असते. ईश्वर तसाच आपल्या भक्तांची काळजी वाहत असतो, त्याचे जीवन सावरत असतो. त्यासाठी जीवाच्या ठिकाणी आर्तता मात्र पाहिजे, म्हणजे व्यापक देवदर्शनाची प्राप्ती, साक्षात्कार त्याला होतो. ईश्वर हा सर्वांच्या आत्म्यामध्ये वसलेला आहे. व्यापक चराचरामध्ये तो सामावलेला आहे. ईश्वर हा प्रेमाचा भुकेला आहे. त्याच्याठायी जातीपातीला महत्त्व नाही, तो सौंदर्याचा भुकेला नाही; त्यामुळेच तो कुब्जावर सुद्धा प्रसन्न झाला. तो वैभवाचा सुद्धा भुकेला नाही, त्यामुळे तो विदुरा घरी धावला. त्याला कलाकौशल्यामध्येच रुची असती तर पेंद्यासारख्याचे लाड त्याने का केले असते, म्हणून ईश्वरावर विश्वास ठेवून आपण

घेण्याची वस्तू नाही. अशा उदाहरणांद्वारे ते लोकांना खरी ईश्वरभक्ती काय याची जाणीव करून देतात. देव हा या जगामध्ये आहे, जगाची सेवा करणे म्हणजेच ईश्वरभक्ती आणि त्यासाठी ते महात्मा गांधीजींचे उदाहरण देतात. महात्मा गांधी यांनी सत्याग्रह केला. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रयत्न केले आणि त्यांनी इंग्रजांना आपल्या देशातून घालवून दिले, आणि म्हणून मानायचे असेल तर महात्मा गांधीजींच्या सारख्यांना आपण देव मानायला पाहिजे. याचा अर्थ संत गाडगे बाबा हे कर्मयोगी होते, कर्माला प्राधान्य देणारे होते. केवळ देवाची भक्ती करून आपल्याला घर प्राप्त होणार नाही. देव घर देत नाही, तर घर बांधण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतात. अंधश्रद्धेच्या गर्तेमध्ये खोलवर बुडालेल्या समाजाला ईश्वरभक्तीचा योग्य मार्ग ते दाखवतात. दया हा खूप मोठा धर्म आहे आणि म्हणून पशुहत्येविरुद्ध ते बोलतात. ईश्वराच्या नावाने कोंबड्या, बकरे कापण्याला त्यांनी विरोध केला. ईश्वर हा बाहेर कुठेही नाही तर तो आपल्यामध्येच वसलेला आहे आणि प्रत्येक प्राणिमात्रांमध्ये तो आहे याची जाणीव इतर संतांप्रमाणे संत गाडगेबाबा यांनी समाजाला करून दिलेली आहे.

**संत तुकडोजी महाराज आणि ईश्वरभक्ती:**

संत तुकडोजी महाराज ईश्वराला 'विश्वचालक'

कोणत्याही प्रकारचा भ्रम त्याच्या मनामध्ये शिल्लक उरत नाही. असा भक्त जो जे कर्म करेल ते त्या ईश्वराची पूजाच होय, अशाप्रकारचा ईश्वरभक्तीविषयक विचार राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा आहे. ईश्वराची प्राप्ती झाल्यानंतर अज्ञान दशा दूर होते. ज्ञानाची कवाडे ही खुली होतात आणि दिव्यत्वाची प्राप्ती होते, जीवन चैतन्यमय होते.

"सूर्य जैसा नभी उगवला। अंधःकाराचा नाश झाला

तैसा तू हृदयी प्रगटला । जीव झाला विश्वव्यापी।।"५

अशा या ईश्वराची प्राप्ती झाल्यानंतर सर्व प्रकारचे विकार शत्रू मरून जातात. वासरू दिसत नसेल तर गाय ही हंबरायला लागते. पक्षिणी आपल्या अंड्याभोवती फिरत असते, आई काम करता करता सुद्धा आपल्या तान्हुल्याला सावरत असते. ईश्वर तसाच आपल्या भक्तांची काळजी वाहत असतो. त्याचे जीवन सावरत असतो. त्यासाठी जीवाच्या ठिकाणी आर्तता मात्र पाहिजे, म्हणजे व्यापक देवदर्शनाची प्राप्ती, साक्षात्कार त्याला होतो. ईश्वर हा सर्वांच्या आत्म्यामध्ये वसलेला आहे. व्यापक चराचरामध्ये तो सामावलेला आहे. ईश्वर हा प्रेमाचा भुकेला आहे. त्याच्याठायी जातीपातीला महत्त्व नाही, तो सौंदर्याचा

सर्वार्थाने त्याच्या चरणी समर्पित व्हावे म्हणजे आपणही विश्वाकार होतो.

ईश्वर सर्वाठायी व्यापलाआहे, तो सर्वांमध्ये विभागला आहे. देवाच्या मूर्तीसाठी सोन्याचे, हिऱ्याचे मुकूट बसविले जातात आणि गरिबाला मात्र साधी लंगोटी सुद्धा दिली जात नाही. देवाचे मंदिर बांधले म्हणून त्याला ईश्वराची आराधना केल्याचे पुण्य प्राप्त होत नाही, याला देवपूजा म्हणता येणार आहे; हे मूर्तीपूजेचे विडंबन झाले आणि यातूनच अज्ञान समाजामध्ये शिरले. त्याचबरोबर देवळामध्ये भजन करायचे आणि बाहेर खोटे भाषण करायचे अशा विसंगतीपूर्ण वागण्यामुळे सुद्धा ईश्वर प्राप्त होत नाही, म्हणून सर्व प्रकारच्या स्वार्थी,अहंकारी भावना सोडून हृदयामध्ये ईश्वराची आराधना करावी, यामुळे आपले मनही प्रसन्न होईल.त्यातून समाधान प्राप्त होईल. शक्ती, तेज प्राप्त होईल,अशा प्रकारचे कार्य करावे. आपला पुरुषार्थ सोडून केवळ नामजप करून सर्व काही ईश्वरावर सोपवून तोच माझे सर्व काही पाहील असे म्हणणे हे सुद्धा चुकीचे आहे. पूजापात्र अवलंबून लाजिरवाणे जीणे जगू नये, असा विचार तुकडोजी महाराजांनी मांडलेला आहे.

समारोप:

संतांची वृत्ती ही 'देह कष्टविती परोपकारे' अशा प्रकारची आहे. अज्ञान, अंधःकार, कर्मकांड, बवाबाजी यामध्ये अडकून पडलेल्या समाजाला जाग अनेक प्रकारच्या देव-देवतांना संतानी विरोध केलेला आहे. त्यांचा दृष्टिकोन भूतदयावादी राहिलेला आहे, त्यामुळेच मांसभक्षण करणाऱ्या क्षुद्र देव-देवता नाकारून संतांनी समाजाचे रक्षण केले. ईश्वर भक्तीसाठी त्यांनी नामस्मरणाचा सोपा मार्ग सांगितला. संसार आणि परमार्थ यांची सांगड घातली. महानुभाव पंथाने संन्यास धर्माला महत्त्व दिलेले आहे. ईश्वर हा एकच आहे आणि तो सर्व प्राणिमात्रांमध्ये, अनुरेणूमध्ये सामावलेला आहे ही जाणीव संतांनी समाजाला करून दिली. ईश्वरभक्तीच्या झेंड्याखाली समाजाला एकत्र आणण्याचे, समाजाला बांधून ठेवण्याचे महत्वाचे कार्य संतांनी केलेले आहे.

संदर्भ टिपा:

१. श्री सकलसंत गाथा, अभंग क्रमांक ४९७

२. निवडक अभंग ज्ञानेश्वर ते तुकाराम, संपादक: डॉ. विद्यासागर पाटंगणकर, आवृत्ती पहिली २०१८, जळगाव, पृष्ठ क्रमांक ३१

३. श्री संत चोखामेळा: चरित्र व अभंग, संपादक:स.भा.कदम, आवृत्ती दुसरी १९९८,श्रीरामपूर, पृष्ठ क्रमांक १३१

४. तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व, संपादक: डॉ. किशोर सानप,प्रा.मनोज तायडे, आवृत्ती तिसरी १९९८ मुंबई, पृष्ठ क्रमांक ९०

५. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, ग्रामगीता, आवृत्ती विसावी २०१०नागपूर, पृष्ठ क्रमांक २